पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 23/01/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :— दिनांक 22/01/2020 चे 22:00 वा. ते 22:30 वा. दरम्यान 14 वर्षीय पिडीत/ फिर्यादी हीला आरोपी नामे— राधेश्याम मनोज जाधव, वय 22 वर्ष, रा. मांडवा, ता. भिवापुर, जि. नागपूर याने पिडीतेसोबत बळजबरीने जबरी संभोग केला. सदर बाब कुणालाही सांगितल्यास आरोपीने पिडीतेस जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376, 506 भादंवि. 4 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पोर्णीमा तावरे या करीत आहे.

## निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. खापा :— अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर गुमगाव मॉयल लि. गुमगाव खापा अंर्तगत नवीन मॉयलचे वर्कशॉपचे काम चालु आहे. त्या कामाचा कॉन्ट्रक्ट चायना कोल क्र. 3 इंडीया प्रयव्हेट लि. या कंपनीला दिला आहे. सदर ठिकाणी 2018 पासुन चायनाचे व भारतीय कामगार काम करीत आहेत. फिर्यादी नामे— आकाश रमांकात उमाळे(लेबर), वय 27 वर्ष, रा. माळीपुरा खापा यांची दिनांक 22/01/2020 रोजी दुपारी 03:30 वा. ते रात्री 11:30 वा. दरम्यानची सेकंड शिप्ट होती. सदर शिप्टमध्ये फिर्यादीला पकडून 13 लोक जमीनीखाली भुयारामध्ये काम करीत होते. त्या 13 लोकांमध्ये 9 भारतीय व 4 चायनीज काम करीत होते. सदर भुयारामधील सायडींगला सिमेंट कॉक्रेटींग करीता लोहा बांधन्याचे काम सुरू होते. दरम्यान फिर्यादीचे सहकारी पंकज चौरीवार हे लोखंडी ॲगलला नट बोल्ट फिट करीत होते व चायनीज चेन गॅग हे त्यांच्या शेजारी उभे राहुन कामाचे देखरेख करीत होते. तेवढयात छतावरून दगड मुरूमाचा छत कोसळुन छताचे ढिगाऱ्याखाली त्याठिकाणी काम करणारे 1) पंकज खुशाल चौरीवार वय 25 वर्ष रा. गडेगाव, 2) चेन गॅग, वय 31 वर्ष, रा. चायना, ह मु. गुमगाव माईन, खापा हे दोघेही दबुन गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला. तर अनिल देवमन बागडे, वय 27 वर्ष, रा. कोच्छी व वॉग युनशान, रा. चायना हे किरकोळ जखमी झाले. सदर घटना ही यातील आरोपी नामे— 1) प्रशांत गेरवार(असीस्टटं मॅनेजर), 2) विजयकुमार स्वराजसिंग व ईतर सर्व रा. गुमगांव माईन खापा यांच्या निष्काळजीपणा मूळे झाली. आरोपीतांनी व्यवस्थीत उपाययोजना करणे गरजेचे होते. परंतू त्यांनी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कुठलीही व्यवस्थित उपाय योजना केलेली नव्हती.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. झांबरे 9028748409 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर